

# माझी शाळा माझी मुलं

■ सविता जोशी-वाळिंबे

या वर्षीचं आमचं हायस्कूल ग्रॅज्युएशन माझ्या दृष्टीनं फारच अर्थपूर्ण होतं. माझी पहिली ‘पहिलीची’ बॅच यावर्षी बारावी पास होत होती. उत्साहात पार पडलेल्या कार्यक्रमानंतर मुलांशी शेकहॅण्ड करताना केव्हन एकदम समोर आला. माझ्या गळ्यात पडून म्हणाला, ‘‘ओह, मिसेस जोशी, आय विल नेव्हर फरगेट यू !’’ आठवतं... अर्थात मला चांगलंच आठवत होतं.

त्या दिवशी सकाळीच जाणवत होतं की फ्ल्यू येऊ घातलाय. पण जाणं महत्त्वाचं होतं म्हणून तशीच शाळेत गेले. थर्मामीटर लावला नाही म्हणजे तापही नाही असं थोडंच असणार. साधारण ११ ते ११.३० च्या दरम्यान आता दिवस धकणार नाही, आता घरी जायलाच हवं हे माझ्या लक्षात आलं. मग मुलांना समजावून सांगितलं आणि सबस्टिट्यूट टीचरला बोलावून घेतलं. तेव्हा आमची रिडिंग स्पेशालिस्ट वर्गात आली होती, ‘सबस्टिट्यूट येईपर्यंत तू कशाला थांबतेस, मी नेईन मुलांना कॅफेटेरियामध्ये’ – ही तिची मदत मी अगदी तत्परतेने स्वीकारली. थोडीफार आवराआवर करून मी निघाले तर कानावर पडलं,‘‘पण आज शुक्रवार आहे आणि दर शुक्रवारी आम्ही जेवायच्या आधी मराठी ग्रेस म्हणतो.’’ मुलांचे रडवले चेहरे बघून, अजून दोन मिनिटांनी काय फरक पडतो असं मनात येऊन मी थांबणार होते तोच कानावर पडलं, ‘‘सगळ्यांनी मला मदत केली तर मी वदनी कवल घेता म्हणीन.’’ मी दाराशीच थांबले. केव्हनच्या मार्गदर्शनाखाली त्या सतरा चिमुरड्यांनी वदनी कवल घेता खणखणीतपणे म्हटले. माझेच नाही तर रिडिंग स्पेशालिस्टचेही डोळे ओले झाले होते. त्यानंतर ती सर्वांना ‘ही सविताची पोरं म्हणजे अगदी मिरॅकल आहेत’ असं सांगत सुटली.

आता ही पोरं माझ्यापेक्षा चांगली फूटभर उंच दिसत होती. पण माझ्या त्यांच्याबद्दलच्या आठवणी ती माझ्यापेक्षा फूटभर लहान होती तेव्हाच्या!

घरी येता येता झॅकरीची गंमत आठवली. त्याच्या आईचा – जिलचा, एका रात्री फोन आला. एखादी विश्वासातील गोष्ट सांगावी अशा हळूवार आवाजात जिल बोलत होती, ‘‘आज सकाळी झॅकरी उठला की नाही हे बघायला मी त्याच्या खोलीत गेले. तो पलंगावर दिसेना तेव्हा हा पडला की काय असं वाटून पलीकडे बघायला गेले तर हा जमिनीवर पालथा! तेवढ्यात त्याने शिस्तीत दोन्ही हात वर केले आणि विशिष्ट स्टेप्स घेतल्या. हा काहीतरी व्यायाम करतो आहे हे माझ्या लक्षात आलं. एक जोरदार श्वास घेऊन त्याने मला बघितलं आणि तो एकदम लाजला आणि म्हणाला, मिसेस जोशींनी शिकवलेले सन सॅल्युटस करीत होतो. नंतर त्याने मला त्या बारा स्टेप्स इतक्या सविस्तर समजावून सांगितल्या की विचारू नकोस! मग आम्ही दोघांनी काही सूर्यनमस्कार घातले. एवढेच नाही तर संध्याकाळी डॅडींना आणि धाकट्या भावाला पण त्याने सन सॅल्युटेशन शिकवले. आता ही इतकी चांगली गोष्ट तुला कळायलाच हवी की नाही? तुझा जास्त वेळ घेत नाही. पण झॅकरी तुझ्या वर्गात वेगळं काहीतरी शिकतो आहे याबद्दल आभार मानून तुला बाय म्हणते,‘‘थँक्यू, फॉर शेअरिंग धीस विथ मी’’, असं म्हणून मी फोन खाली ठेवला.



माझ्या पहिलीच्या वर्गात सहजच म्हणून सुरू केलेल्या अशा छोट्या गोष्टींचे पालकांना खूपच अप्रूप वाटत होतं. मुलांचं तर विचारलायलाच नको. 'तू फक्त आम्हाला शिकव. मग बघ आम्ही काय करतो ते!' अशी एकूण वृत्ती.

आमचं इंडिया युनिट मी साधारण फेब्रुवारीच्या सुमाराला सुरू करते तेव्हा माझ्याच नव्हे तर बाकीच्या दोन्ही पहिल्या वर्गांना ३–४ आठवडे भौगोलिक, नैसर्गिक, सांस्कृतिक आणि स्वातंत्र्योत्तर काळातल्या आधुनिक भारतदर्शनाची झलक मिळते. पण माझ्या वर्गातील मुलं वर्षभर भारत जगतात.



वर्षाच्या सुरुवातीलाच कोणीतरी विचारतं, ''हिंदीमध्ये एलिफंटला हाथी म्हणतात ना?'' त्यांच्या मोठ्या भावंडाकडून त्यांनी ऐकलेलं असतं. मग बघता बघता आम्ही, ''चल चल चल मेरे साथी'' असं गायला लागतो. तीनचार दिवसांत सगळे जण संपूर्ण ध्रुवपद व्यवस्थित शिकतात.

वेगवेगळ्या जनावरांची नावं शिकताना बंदर मधला 'र' कसा म्हणायचा, अस्वलाला 'बालू' न म्हणता 'भालू' कसं म्हणायचं, खटारा – खिंचके म्हणताना इंग्रजीमध्ये नसलेला 'ख' कसा उच्चारायला हे सुद्धा पटकन शिकतात.

'चूँ चूँ करती आयी चिडिया' हे गाणं तर मुलांचं एकदम लाडकं. या गाण्याची टेप मिळविण्यासाठी मी किती जंग जंग पछाडले होते. पण रफीच्या आवाजात आवाज मिसळवून हे चिमुकले अमेरिकन्स गाऊ लागले की त्या सगळ्या श्रमांचं सार्थक झाल्याचा आनंद होतो. एखादे नवीन हिंदी गाणं त्यांना शिकवावं असे ठरवलं की वाटतं हे गाणं मुलांना अवघड तर वाटणार नाही? पण मला राहवत नाही आणि मुलांनाही काही नवीन ट्राय करायला आवडेल, हे माहीत असतंच. त्यांचे उत्सुक चेहरे तर मला नेहमीच जणू आवाहन करीत असतात. मग मी नवी हिंदी गाणी शिकवते, गुजराथी नृत्य बसवून घेते.

भारतीय पोशाख घालून ही मुलं आपले खास मराठी खेळ खेळतात. हौसेहौसेने लेझिम शिकतात. एवढंच नव्हे तर माझ्याबरोबर भारताची काल्पनिक सफरसुद्धा करून येतात. तिथून ते घरच्यांना पत्र लिहितात, ताजमहाल किती सुंदर होता किंवा मिसेस जोशींच्या घरचं जेवण किती टेस्टी होतं... इ. कुणीकुणी असंही लिहून कळवतात की ते जेवण खूपच तिखट व मसालेदार असल्याने त्यावर खूप पाणीही प्यावं लागलं. या सगळ्यानंतर खास हायलाईट कार्यक्रम येतो. पहिल्या ग्रेडची मुलं त्यांची नावं मराठीमध्ये लिहायला शिकतात. स्वत:ची मराठी नेमप्लेट प्रयत्नपूर्वक सजवितात. काहीजण तर भारतीय तिरंगा ही नावासोबत रंगवितात. आता हे सगळं समोर असताना मन भूतकाळाचा आढावा घेतं...

मला खरी मनापासून मुलांना शिकवायची आवड. या ध्येयाने शाळा सुरू केली. विविध ठिकाणी अर्ज केले. तसाच आमच्या भागातील अतिशय दर्जेदार समजल्या जाणाऱ्या जर्मन टाऊन अ‍ॅकॅडमीतही केला होता. तिथे नोकरी मिळणं कठीण पण तरीही शिकवायची संधी मिळावी अशी मला मनापासून इच्छा होती. तिथला इंटरव्ह्यू एकदोन तासांचा नसून संपूर्ण दिवसभराचा होता. शेवटी ज्या प्रश्नाचं हुकमी उत्तर नसतं तो प्रश्न आला, ''एवढ्या सगळ्या उमेदवारांतून आम्ही तुलाच का निवडावं?'' माझ्या मैत्रिणीचा उपदेश आठवला, "Savita, this is where you can not be modest. Make the believe that you are the one!" तिला स्मरून मी म्हटलं होतं, ''लहानपणी मुलांना टीचर म्हणजे दैवत असतं. या कोवळ्या वयात या मुलांना आपल्यापेक्षा वेगळं दिसणाऱ्या आणि असणाऱ्या व्यक्तीकडून शिकायला मिळालं तर अशा वेगळेपणाचा आदर करण्याची भावना त्यांच्यात रुजवली जाईल.ङ्ङ

**''लहानपणी मुलांना टीचर म्हणजे दैवत असतं. या कोवळ्या वयात या मुलांना आपल्यापेक्षा वेगळं दिसणाऱ्या आणि असणाऱ्या व्यक्तीकडून शिकायला मिळालं तर अशा वेगळेपणाचा आदर करण्याची भावना त्यांच्यात रुजवली जाईल.''**

एकदा एक आई सांगत होती, ''आम्ही आमच्या चर्चमध्ये खूप अ‍ॅक्टिव्ह आहोत. त्यामुळे आमचा संबंध फक्त अँग्लो सॅक्सन लोकांशीच येतो. पण त्यामुळेच माझी मुलगी तुझ्या वर्गात होती. मला इतका आनंद वाटतो. आमच्या विश्वापलीकडे जगात कितीतरी स्वागतार्ह गोष्टी आहेत. वेगळ्या असल्या तरी इतर चालीरीतीसुद्धा किती आदरणीय आहेत हे तिला इतक्या लहान वयात समजले.'' मी तिला ओह, थँक्यू म्हणता म्हणता मनात एक्झॅटली माय पॉइंट असंही म्हटलं.



हे इवलंस रोप लावलं, त्या रोपाचा चिमुकला ताटवा झाला याचं समाधान वाटतं. त्याचबरोबर आनंददेखील. मुलांना शिकविताना वाटतं यांच्या मनात आता भारताची एक प्रतिमा आहे. कदाचित हे चित्र जरा जास्त गुलाबी असेल. पण जेव्हा ती ऐकत राहतील की भारत हा थर्ड वर्ल्ड कंट्रीजपैकी एक आहे, तो गरीब आहे, वाघ-सिंहांचा, हत्तींचा, नागाचा देश आहे. तिथे गांधी होऊन गेले, तो आऊटसोर्सिंगचा हुकमी एक्का आहे, तेव्हा ते नक्कीच म्हणतील, ही पुस्तकी माहिती झाली हो! जोडीनं भारत तितकाच प्रगत आहे. तिथे सुंदर संगीत आहे, समृद्ध भाषा आहे, आपल्या तोडीची टेक्नॉलॉजी आहे. तिथेही बुद्धिमान कलावंत आहेत, खेळाडू आहेत, इंजिनिअर्स आहेत, अकाऊंटंटस आहेत, डॉक्टर्स आहेत आणि हो टिचर्सदेखील आहेत... आणि कदाचित ते त्यांच्या मुलांना शिकवतील, ''चूँ चूँ करती आयी चिडिया...''

■

सविता जोशी (वाळिंबे)
sjoshi@germantownacademy.org